**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक- 02.04.2025** **वार- बुधवार**

---

- रिझर्व्ह बँक ही देशाच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे गौरवोद्गार
- वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर केलं जाणार; भाजपा, शिवसेना आणि कॉंग्रेसकडून संबंधित खासदारांना पक्षादेश जारी
- राज्यात एक लाख लोकसंख्येच्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार
- जुनं वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास नव्यासाठी १५ टक्के कर सवलत देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- आणि
- राज्याच्या विविध भागात पावसाची हजेरी; आगामी दोन दिवसंही विजांसह पावसाचा इशारा

**<u>राष्ट्रपती</u>**
रिझर्व्ह बॅंक ही देशाच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ असून भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक पातळीवर महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यात रिझर्व्ह बॅंकेचा मोठा वाटा आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले. भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या ९०व्या वर्धापनदिनाचा सांगता सोहळा काल मुंबईत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडला; त्यावेळी त्या बोलत होत्या. सामान्य नागरिकांचा भारतीय रिझर्व्ह बॅंकेवरचा विश्वास हेच रिझर्व्ह बॅंकेचं गेल्या नऊ दशकातलं सर्वात मोठं यश आहे, असं त्या म्हणाल्या.

विकसित भारताच्या दिशेने पुढे जात असताना, अर्थव्यवस्थेतील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि समावेशक वित्तीय प्रणाली आवश्यक असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या.

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं आगामी दशक अतिशय महत्त्वाचं असून आर्थिक समावेशन, ग्राहक सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी भारतीय रिझर्व्ह बॅंक वचनबद्ध आहे, अशी ग्वाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्वागतपर संबोधनात दिली. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपस्थित होते.

**<u>वक्फसुधारणा</u>**
वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर करण्यात येणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्याकडे अल्पसंख्याक व्यवहार विभागाचाही कार्यभार असून ते आज सभागृहात हे विधेयक मांडतील.

विधेयकावर ८ तासांची चर्चा घेण्यात येईल आणि सभागृहाला आवश्यक वाटल्यास चर्चेचा कालावधी वाढवण्यात येईल असं त्यांनी संसद भवन परिसरात प्रसार माध्यमांना सांगितलं. या विधेयकाबाबत कोणत्याही प्रश्नांची उत्तरं द्यायची सरकारची तयारी आहे, असं सांगून रीजीजू म्हणाले की विरोधी पक्षांना अनुनयाचं धोरण राबवायचं असल्याने ते या विधेयकाला विरोध करत आहेत.
दरम्यान वक्फ सुधारणा विधेयक मांडलं जाणार असल्याने भाजपा, शिवसेना आणि काँग्रेसनेही आपापल्या खासदारांना आजपासून पुढचे तीन दिवस लोकसभेत हजर राहण्याबाबतचा पक्षादेश काढला आहे.

नक्षलवाद

देश नक्षलमुक्त होण्याच्या दिशेने मोठी पावलं उचलत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे. देशातील नक्षलवादी जिल्हयाची संख्या 12 वरुन 6 वर आणण्यात सरकारला यश आल्याचं त्यांनी नमूद केलं. केंद्र सरकार, नक्षल चळवळी विरोधात कठोर पावलं उचलत असून, सशक्त, सुरक्षित आणि समृद्ध भारताची निर्मिती करत आहे. 31 मार्च 2026 पर्यन्त देशातून नक्षल चळवळ समूळ नष्ट होईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला आहे.

**<u>मंत्रिमंडळनिर्णय</u>**

राज्यातील किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता बाईक टॅक्सी धावणार आहेत; याबाबतच्या धोरणाला काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बाईक टॅक्सीच्या प्रवासी भाड्याचे दर संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरण निश्चित करणार आहे.

रस्त्यावरील वाहन संख्या कमी होण्याच्या दृष्टीनं खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायालाही शासनाने मान्यता दिली आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कायद्यांतर्गत योग्यता प्रमाणपत्र, विधीग्राह्य परवाना आणि विमा संरक्षण बंधनकारक असेल.

जुनं वाहन स्वेच्छेने मोडीत काढणाऱ्या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचं नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला.
गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख आणि औद्योगिक गौण खनिजांच्या व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्यासाठीही कालच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**<u>Intro</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या, संगमेश्वरी बोलीभाषेत सादर होणाऱ्या 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' या लोकनाट्याने नुकताच पाचशे प्रयोगांचा टप्पा गाठला. हा अनोखा विक्रम करणाऱ्या या लोकनाट्याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी...

स्क्रिप्ट

रत्नागिरीतल्या 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' या लोकनाट्याने ५०० प्रयोगांचा टप्पा ओलांडला आहे. संगमेश्वरी बोलीतल्या या लोकनाट्यातून भजन, जाखडी, नमन यांसारख्या लोककला सादर केल्या जातात. एक मुंबईकर लोककलांवर माहितीपट करण्यासाठी येतो. त्याला इथली इरसाल माणसं भेटतात. त्यातून विनोदनिर्मिती होते, लोकसंस्कृतीचं दर्शन घडतं आणि कोकणातल्या समस्यांचं वास्तवही मांडलं जातं, असं या नाट्याचं स्वरूप. गिरीश आणि आनंद बोंद्रे यांच्या संकल्पनेतून १० वर्षांपूर्वी पाच-सहा कलाकारांनी एकत्र येऊन सुरुवात केलेलं हे नाटक आता २२ जणांचा संच साकारतो. मदतनिधीसाठी प्रयोग करून या चमूने सामाजिक बांधिलकीही जपली आहे. कोकणातल्या लोककला जपल्या, तर लोकांकडून आजही चांगला प्रतिसाद मिळतो, असा आमचा अनुभव असून, त्यात नको ते बदल करणं योग्य नाही, असं या लोकनाट्याचे मुख्य सूत्रधार तात्या गावकार म्हणजेच सुनील बेंडखळे म्हणाले. कोकणात सहकार रुजत नाही असं म्हटलं जात असलं, तरी आमच्या चमूने सांस्कृतिक क्षेत्रातल्या सहकाराचं दर्शन घडवलं असल्याचंही त्यांनी सांगितलं. नव्या पिढीनेही याकडे या दृष्टीने पाहावं, असं त्यांनी नमूद केलं. अस्सल स्थानिक कलाकृती संस्कृतिवाहक कशी ठरू शकते आणि बोलीभाषेच्या पुनरुज्जीवनालाही कसा हातभार लावू शकते, हे या लोकनाट्याच्या उदाहरणावरून दिसतं. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी

**<u>भारतनेट</u>**

भारत नेट प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, राज्यातल्या उर्वरित प्रत्येक ग्रामपंचायतीपर्यंत संपर्क यंत्रणा प्रस्थापित करण्याच्या सूचना केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिल्या आहेत. मुंबईत यासंदर्भात काल झालेल्या बैठकीत ते  बोलत होते. राज्यामध्ये गडचिरोलीसह दुर्गम आणि अतिदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यास राज्यशासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलतांना दिली.

**<u>पर्यटन</u>**

राज्य शासनाच्या पर्यटन विभागा अंतर्गत, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि स्थानिक जिल्हा प्रशासनानं राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी येत्या २ ते ४ मे या कालावधीत ‘महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचं’ आयोजन केलं आहे. या महोत्सवाच्या बोधचिन्हाचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल मुंबईत करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महोत्सवाचं २ मे रोजी उद्घाटन होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. महाबळेश्वर आणि परिसरातील प्रेक्षणीय स्थळे, स्थानिक कला – संस्कृती, खाद्यसंस्कृतीची ओळख पर्यटकांना व्हावी आणि या माध्यमातून पर्यटनवृद्धी व्हावी हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

**<u>पेरण्या</u>**

राज्यात यंदाच्या 2024-25 या उन्हाळी हंगामात  4 लाख 5 हजार 341 हेक्टरवर क्षेत्रावर पिकांच्या पेरण्या पूर्ण झालेल्या आहेत. तसेच बहुतांश पिकांच्या सरासरी क्षेत्रांहून अधिक पेरण्या पूर्ण झालेल्या असल्याने पिकांच्या उत्पादनातही वाढ होण्याचा कृषी आयुक्तालयाचा अंदाज आहे.  गेल्या वर्षापेक्षा यंदा उन्हाळी पिकांच्या उत्पादनात वाढ होणार असल्याची माहिती पुणे कृषी आयुक्तालयाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे  यांनी दिली आहे.

**<u>पशुगणना</u>**
पुण्यासह संपूर्ण राज्यात यंदा प्रथमच ऑनलाइन पशुगणना होत आहे. यामध्ये १६ प्रजातींची नोंद करण्यात येत आहे.

**<u>दिव्यांग</u>**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात 100 दिवसाच्या उपक्रमामध्ये कालपासून "दिव्यांग सक्षमीकरण अभियान" सुरू करण्यात आलं आहे. या अभियाना अंतर्गत दिव्यांगांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती प्रभारी आयुक्त रविकांत अडसूळ यांनी दिली आहे.

**<u>आयपीएल</u>**
आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल लखनौ इथं झालेल्या सामन्यात किंग्ज इलेव्हन पंजाब संघाने लखनौ सुपर जायंट्स संघाचा 8 गडी राखून पराभव केला.

**<u>पाऊस</u>**
सातारा आणि सांगली जिल्ह्याच्या काही भागात काल वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यातही काल संध्याकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. पालघर जिल्ह्यातल्या काही भागात तसंच धारशिव आणि अकोला जिल्ह्यातही काल हलका पाऊस पडला.
जालना जिल्ह्यात काही ठिकाणी काल पावसानं हजेरी लावली. यामुळे मका, गहू आणि हरभऱ्याचं मोठं नुकसान झालं आहे.
पुणे शहरात काही ठिकाणी रात्री उशिरा पावसाच्या हलक्या सरी पडल्या.

**<u>हवामान</u>**
येत्या २४ तासात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.